# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 10 June 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १० जून २०२४ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पदभार स्वीकारल्यानंतर प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा सतरावा हप्ता जारी केला. याअंतर्गत जवळपास २० हजार कोटी रुपये वितरीत करण्यात आले असून, याचा नऊ कोटी तीन लाख शेतकर्यांना फायदा होणार आहे. आमचं सरकार शेतकरी कल्याणसाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. त्यामुळे पदभार स्वीकारल्यानंतर स्वाक्षरी केलेली पहिली फाईल शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी असल्याचं, पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले.

****

जम्मू काश्मीरमध्ये काल प्रवासी बसवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा दलांनी आज शोधमोहिम राबवण्यास सुरुवात केली. लष्कर, पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दल या सुरक्षा दलांनी राजौरी जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या रयाथ, पोनी, शिव खोरी परिसराला घराव घातला असून, ही शोधमोहिम अद्यापही सुरु असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर राज्यात कुठेही बी-बियाण्यांची चढ्या भावानं विक्री अथवा बोगस वाणांची विक्री, अनावश्यक खरेदीची सक्ती केली जात असल्यास शेतकऱ्यांना त्याविरुद्ध तक्रार नोंदवता यावी, यासाठी 'कृषी तक्रार व्हाट्सअॅप हेल्पलाईन क्रमांक' जारी करण्याचे निर्देश कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले आहेत. राज्याच्या खरीप हंगामाच्या नियोजनाच्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. यानुसार कृषी विभागाकडून 98 22 44 66 55 हा व्हॉट्सअॅप क्रमांक जारी करण्यात आला आहे. यावर तक्रार नोंदवणाऱ्याचं नाव पूर्णपणे गोपनीय ठेवलं जाईल, अशा स्वरुपाच्या तक्रारी दुकानाचं नाव, ठिकाण, तालुका, जिल्हा यांसह

उपलब्ध असलेल्या पुराव्यासह, दिलेल्या व्हाट्सॲप क्रमांकावर पाठवाव्यात असं आवाहन धनंजय मुंडे यांनी केलं आहे.

****

मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातल्या मरीन ड्राइव्ह ते हाजी अली मार्गिकेतल्या भूमिगत बोगद्याचं उद्घाटन आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होत आहे. त्यानंतर ११ जूनपासून या मार्गावरची वाहतूक सकाळी सात ते रात्री ११ या वेळेत नियमित सुरू होईल. या मार्गावर सोमवार ते शुक्रवार वाहतूक सुरु राहील, तर शनिवार आणि रविवारी प्रकल्पाची उर्वरित कामं सुरु असल्यामुळे हा मार्ग बंद राहील.

****

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २५ वा वर्धापन दिन आज साजरा होत आहे. त्यानिमित्त मुंबईत पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, मंत्री हसन मुश्रीफ, अनिल पाटील, रुपाली चाकणकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना अजित पवार यांनी, आज दुपारी तीन वाजता षण्मुखानंद सभागृहात मेळावा आयोजित करण्यात आला असून, या मेळाव्यात आपण भूमिका स्पष्ट करणार असल्याचं सांगितलं.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत देखील अहमदनगर इथं पक्षाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

****

देशात २०१६ मध्ये दिव्यांगांसाठी कायदा येण्यापूर्वी, पुण्यातल्या विविध सेवा संस्था काम करत होत्या, त्यातूनच महाराष्ट्रात दिव्यांग मंत्रालय निर्माण झालं, हे देशातलं पहिलं मंत्रालय आहे, असं राज्याचे दिव्यांग विभागाचे आयुक्त प्रवीण पुरी यांनी म्हटलं आहे. दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या, सक्षम या राष्ट्रीय संस्थेच्या त्रैवार्षिक राष्ट्रीय अधिवेशनाच्या समारोप काल पुण्यात झाला, त्यावेळी ते बोलत होते. दिव्यांग व्यक्तींनी केलेली असामान्य कामगिरी सर्वांपर्यंत पोहोचवावी असं आवाहन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य सुहास हिरेमठ यांनी यावेळी केलं.

****

अकोला इथल्या डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या राज्यातल्या चारही कृषी विद्यापीठांच्या संयुक्त कृषी संशोधन आणि विकास समितीच्या ५२ व्या बैठकीचा काल समारोप झाला. राज्यातलं कृषी क्षेत्र

बळकट करण्यासाठी आणि एकूणच शेतकरी बांधवांच्या उर्जितावस्थेसाठी चारही कृषी विद्यापीठं करत असलेल्या निरंतर संशोधनामुळे मोलाचा हातभार लागला आहे. हवामान बदलाच्या काळात भविष्यात शाश्वत स्वरूपाच्या शेतीच्या दृष्टीनं, कृषी क्षेत्रातील भरीव संशोधनाची आवश्यकता अधोरेखित होते, असं प्रतिपादन राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर प्रशांत पाटील यांनी यावेळी केलं.

****

राज्यात गेल्या सहा महिन्यांपासून क्षयरोगाच्या औषधांचा तुटवडा जाणवत आहे. मात्र आता केंद्र सरकारकडून राज्याला क्षयरोगाची अतिरिक्त औषधं पुरवण्यात आली आहेत. ही औषधं जिल्हयांना वितरित केली जाणार आहेत, अशी माहिती क्षयरोग आणि कुष्ठरोग विभागाचे उपसंचालक डॉक्टर संदीप सांगळे यांनी दिली.

****

भारताचा टेनिसपटू सुमीत नागलनं एटीपी चॅलेंज टेनिस स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं. काल झालेल्या अंतिम सामन्यात त्याने स्वित्झर्लंडच्या खेळाडुचा सहा – एक, सहा – सात, सहा – तीन असा पराभव केला.

****

भारतीय मुष्टीयोद्धा पूजा तोमर ही अमेरिकेतल्या युएफसी ही मुष्टीयुद्ध स्पर्धा जिंकणारी पहिली भारतीय ठरली आहे. पूजानं ब्राझीलच्या रायने अमांडा डॉस सँटोस हिला १५ मिनिंटात स्ट्राईक पॉईंटनं नमवून अव्वल स्थान पटकावलं.

****